**<u>नियमित दिवाणी दावा क्र. १६७/२०२६ मधील आदेश नि. क्र. ०८</u>**

(CNR No. MHSO-1300-0189-2026)

वादीने प्रस्तुत अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६, नियम १७ प्रमाणे वादपत्रामध्ये दुरुस्ती करण्याकरिता दाखल केला आहे.

२. प्रतिवादी तर्फे सदर अर्जास म्हणणे देण्यात येवून अर्ज मंजूर करण्यास त्यांची हरकत नाही असे म्हणणे दिले आहे.

३. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादीतर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

४. प्रस्तुत दावा वादीतर्फे वाटप व पृथक कब्जा मिळणेसाठी दाखल करण्यात आला आहे. वादीचे कथन असे की, दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. ४ याचे नाव ''शंकर महादेव गरड'' असे नमुद केले आहे. मात्र प्रतिवादी क्र. ४ चे वडिलाचे नाव ''महादेव'' नसून ''रामलिंग'' असे आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. ४ याचे वडिलाचे नाव ''महादेव'' चे ठिकाणी ''रामलिंग'' असे लिहीणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

५. वादीने प्रस्तुत अर्जातील मजकुराचे पुष्टयर्थ शपथपत्र दाखल केले आहे. तसेच आजरोजी प्रतिवादींतर्फे सर्व प्रतिवादींचे आधार कार्डची पडताळणी प्रत दाखल करण्यात आली आहे. त्यामध्ये प्रतिवादी क्र. ४ याचे नाव ''शंकर रामलिंग गरड'' असल्याचे निष्पण्ण होते. प्रतिवादीतर्फे सदर अर्ज मंजूर करण्यास हरकत नोंदवण्यात आली नाही. सदर दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची असल्याचे निष्पण्ण होते. प्रतिवादी क्र. ४ याचे वडिलांचे नावामध्ये दुरुस्ती केल्याने सदर दाव्याचे मुळ स्वरुपामध्ये कोणतही बदल होणार नाही. सदर प्रक्रियेतील दोष टाळण्याकरीता वादी मागणी करीत असलेली दुरुस्ती मंजूर करणे आवश्यक आहे. सदर दुरुस्ती मंजूर केल्यास प्रतिवादींचे हितास कोणताही बाध निर्माण होणार नाही. अशा परिस्थितीत सदर दुरुस्ती मंजूर करणे उचित होईल. सबब, प्रस्तुत अर्ज मंजूर करणेस पात्र आहे. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात आला.

२. अर्जात नमूद केल्याप्रमाणे वादी दाव्यात करु इच्छीत असलेली दुरुस्ती त्यांनी पुढील सुनावणीपर्यंत करुन दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

HARSHADA UMATAI UTTAM PATIL
Digitally signed by HARSHADA UMATAI UTTAM PATIL
Date: 2026.03.16 11:30:40 +0530

दि. १३/०३/२०२६. (श्रीमती एच. यु. यु. पाटील)

तिसरे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, बार्शी

# CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | A. A. Chavan. |
| (b) | Court | : | Smt. H.U.U. Patil,<br>3rd Jt. Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C.Barshi |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 13/03/2026 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 13/03/2026 |